## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र. ६ /का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ३ ऑक्टोबर, २००७.

## आ दे श

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ५ब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५ब, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम ९अअ, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९अ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १०-१-क व मुंबई जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२क नुसार अशी तरतूद करण्यात आली आहे की, कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या सदस्यांनी निवडून आल्याच्या दिनांकापासून ४ महिन्यांच्या मुदतीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्राच्या बाबतीत दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसे हमीपत्रही राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराकडून घेण्यात येते. या कलमाखाली अशी तरतूद करण्यात आली आहे की, त्या व्यक्तीने निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली आहे असे मानण्यात येईल आणि ती स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल.

वरील सर्व तरतुदींमध्ये अनर्हतेसंबंधी आदेश कोणी काढावयाचे याचा उल्लेख नाही. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, संबंधित तरतुदींमध्ये अनर्हतेचे आदेश कोणी काढावयाचे याचा उल्लेख नसल्यामुळे बऱ्याचदा तसे आदेश निघत नाही व राज्य निवडणूक आयोगाकडे रिक्त जागाही कळविण्यात येत नाही. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी व राज्य निवडणूक आयोगाला दिलेली रिक्त जागांची माहिती तातडीने मिळावी व त्या रिक्त जागांबाबत कायदयातील तरतुदीनुसार निवडणूक लवकरात लवकर घेणे शक्य व्हावे यासाठी राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४(४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड) च्या कलम ९-बी(४), महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए

(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए(४) अन्वये पुढीलप्रमाणे कार्यपध्दती ठरवून देत आहे :-

(१) महानगरपालिका सदस्यांमधून ज्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले त्यांच्या बाबतीत अनर्हतेचे आदेश जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे कळल्यापासून त्वरीत व जास्तीत जास्त १५ दिवसांचे आंत महानगरपालिका आयुक्तांनी काढून तो संबंधित सदस्यांवर बजावावा.

(२) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या बाबतीत विभागीय आयुक्तांनी ज्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे त्यांच्या बाबतीत अनर्हतेचे आदेश जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे कळल्यापासून त्वरीत व जास्तीत जास्त १५ दिवसांचे आंत काढून तो संबंधितांवर बजावावा. संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही सदस्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने कळविल्यानंतर तात्काळ ते विभागीय आयुक्तांना कळविणे बंधनकारक असेल.

(३) नगर परिषदा व नगर पंचायती आणि ग्रामपंचायती यांच्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी ज्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे त्यांच्या बाबतीत अनर्हतेचे आदेश जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे कळल्यापासून त्वरीत व जास्तीत जास्त १५ दिवसांचे आंत काढून तो संबंधितांवर बजावावा. संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही सदस्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने कळविल्यानंतर तात्काळ ते जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे बंधनकारक असेल.

(४) अनर्हतेचे आदेश बजावण्यासंबंधी संबंधित महानगरपालिकांचे सचिव, संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समित्यांबाबत संबंधित गट विकास अधिकारी, नगर परिषदा व नगर पंचायतींबाबत संबंधित मुख्याधिकाऱ्यांनी व ग्रामपंचायतींबाबत संबंधित सरपंच किंवा उप सरपंच आणि संबंधित अधिकारी यांनी अनर्हतेचे आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याला संपूर्ण सहकार्य दयावे.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्यास त्या सदस्याला अनर्ह ठरविण्याचे आदेश काढण्यात येऊ नये. संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही सदस्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने कळविल्यानंतर तात्काळ ते जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे बंधनकारक असेल.

संबंधित सदस्यांच्या अनर्हतेचे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसांच्या आंत राज्य निवडणूक आयोगाकडे जागा रिक्त झाल्यासंबंधी अहवाल पाठविण्यात यावा. ही जबाबदारी महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त, नगर परिषदा व नगर

पंचायतींच्या **बाबतीत जिल्हाधिकारी** व मुख्याधिकारी, जिल्हा **परिषदा** व पंचायत समित्या यांच्या बाबतीत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतींच्या **बाबतीत** जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची असेल.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतोचे मुख्याधिकारी
सर्व गट विकास अधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\orders.doc